# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२१६५९४

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्र./ गो.वि./महा.वि /1991/२०१५
दिनांक 9/११/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :– महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यामध्ये रॅगिंगच्या घटना होऊ नयेत यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाचे पालन सक्तीचे करण्याबाबत.**

संदर्भ :– शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र ४८७/विशि–३ दि. ११/०८/२०१५

मा. महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सिव्हील अपिल ८८७/२००९ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून विद्यापीठ अनुदान आयोगाने UGC regulations on Curbing the menaces of ragging in higher educational institutions २००९ तयार केले असून ते युजीसीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

रॅगिंग हा गुन्हा असून रॅगिंगला आळा घालण्यासठी तात्काळ अतिप्राथमिकता देणे आवश्यक आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व शैक्षणिक संस्थांना याबाबत सहकार्य देणे बंधनकारक केले असून शासनाच्या रॅगिंगला आळा घालने व रॅगिंग झाल्यास होणारे परिणाम याबाबत दिलेल्या आदेशाचे पालनकरणे बंधनकारक केले आहे.

तरी कोणत्याही शैक्षणिक संस्थामध्ये/महाविद्यालयामध्ये रॅगिंगच्या घटना घडू नयेत यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १७ जून, २००९ अन्वये किहीत केलेल्या नियमांचे सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांनी पालन करणे सक्ताचे आहे व त्याकरीता योग्य कार्यवाही घेण्यात यावी.

कळावे,

**(डॉ.एस.एम.रोकडे)**
**संचालक(प्रभारी)**
**महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:– वरिलप्रमाणे

**महाराष्ट्र शासन**

1673 20/10/15
742 23/10/15

क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८७ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ई-मेल:- htdvishi४३@gmail.com
दि. ११/०८/२०१५

प्रति,

१) संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

२) संचालक,
तंत्र शिक्षण, धोबी तलाव,मुंबई- १

३) संचालक,
व्यवसाय शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण,
धोबी तलाव, मुंबइई- १

४) संचालक,
ग्रंथालय, टाऊन हॉल,
मुंबई-२३.

५) संचालक,
कला संचालनालय, विरुध्द फोर्ट स्टेशन
मुंबई-१

६) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 7765 दि. 19/10/15
जावक क्र. ....... दि. .......

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 947 दि. 17/10/15
जावक क्र. 1025 दि. 19/10/15

**विषय:-** महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यामध्ये रॅगिंगच्या घटना होऊ नयेत यासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या नियमाचे पालन सक्तीचे करण्याबाबत.

महोदय,

सोबत उपरोक्त विषयाबाबत सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी मा. मुख्यसचिव यांना पाठविलेल्या पत्राची प्रत जोडली आहे.

सदर पत्रान्वये, कळविले आहे की, सिव्हील अपिल ८८७/२००९ मध्ये मा. सवोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने केले UGC Regulations on Curbing the menaces of ragging in higher educational institutions २००९ तयार असून ते युजीसीच्या बेवसाईट वर उपलब्ध आहे.

रॅगिंग हा गुन्हा असून रॅगिंगला आळा घालण्यासाठी तात्काळ अतिप्राथम्य देणे आवश्यक आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व शैक्षणिक संस्थाना याबाबत सहकार्य देणे बंधनकारक केले असून शासनाच्या रॅगिंगला आळा घालणे व रॅगिंग झाल्यास होणारे परिणाम याबाबत दिलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक केले आहे.

विद्यापीठ गेल्या ७ वर्षात महाराष्ट्र शासनाशी संबंधित १७० प्रकरणे आली असून ती जास्त आहेत. ही बाब स्वीकारार्ह नसून देशातील उच्च शिक्षण पध्दतीवर प्रतिकूल परिणाम कारक आहे. त्यामुळे 'राज्य रॅगिंग मुक्त' करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

तरी राज्यातील कोणत्याही शैक्षणिक संस्थामध्ये/ महजाविद्यालयामध्ये रॅगिंगबाबतच्या घटना घडू नयेत यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १७ जून, २००९ अन्वये विहीत केलेल्या नियमांचे सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांनी पालन करणे सक्तीचे असल्याबाबत आवश्यक सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांना देण्यात याव्यात व यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती शासनास अवगत करावी ही विनंती.

आपला,

...म खरात)
...हाराष्ट्र शासन

२५